पुण्य नगरी | गुरुवार, १६ ऑक्टोबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत

**कोल्हापूर :** शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने सोलापूर जिल्ह्यातील करमळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मदत केली. कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी सढळ हाताने मदत केली. एकूण रुपये १ लाख २८ हजार ६३० रुपये इतकी रक्कम मदत म्हणून देण्यात आली. यावेळी करमाळा, सोलापूर येथील विविध भागात जाऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी करुन यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना सॅक, वहया, फराळाचे पदार्थ वाटप केले. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडे खरेदीसाठी रक्कम वर्ग करण्यात आली. यावेळी डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए. एस. कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एस. एस. अंकुशराव, प्रा. ए. बी. वसेकर, एस. के. धनवडे उपस्थीत होते.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा • गुरुवार दि. १६ ऑक्टोबर २०२५

# विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळावे : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार

**जनप्रवास : कोल्हापूर**

डॉ. ए.पी.जे .अब्दुल कलाम विद्यार्थी प्रेमी, उत्तम वाचक होते. त्यांचा आदर्श समोर ठेवत विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांच्या आहारी न जाता वाचनाकडे वळावे, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर .कुंभार यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज मधील ग्रंथालय मराठी विभाग एनसीसी व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. डॉ. ए.पी.जे .अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा केला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या परिपत्रकानुसार संविधानातील उद्देशिका ,मूलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन विद्यार्थी व प्राध्यापक यांनी केले.

विद्यार्थिनी श्रावणी अडसूळ हिने मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले. सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. एनसीसी प्रमुख प्रा. मेजर सुनिता भोसले, प्रा. रोहिणी रेळेकर आदी उपस्थित होते.

.10.25

6.10.25

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा
● गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५
१

# करमाळ्यातील विद्यार्थ्यांना विवेकानंदतर्फे मदत




**जनप्रवास : कोल्हापूर**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने राज्यातील पूरग्रस्त भागातील सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्यातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मदत केली. त्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी स्वइच्छेने पैसे जामा केले. एकूण रुपये १ लाख २८ हजार ६३० इतकी रक्कम जमा झाली.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी केली. सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्यामधील

## ● १ लाख २८ हजार रूपयांची मदत

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सॅक, वहया, फराळाचे पदार्थ आदी साहित्याचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडेखरेदीसाठी रक्कम वर्ग केली. यामध्ये एनएसएस, राष्ट्रीय छात्र सेना यानी पुढाकार घेतला. उपक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शना खाली डॉ. एस. पी. थोरात, डॉ.श्रुती जोशी, डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए एस कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एस. एस. अंकुशराव, प्रा. ए. बी. वसेकर, एस के धनवडे यांनी केले.